सामाजिक न्यायाचे पुढचे पाऊल.
असंघटीत कामगारांसाठी जनश्री विमा योजना लागू करणे.

महाराष्ट्र शासन
उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,
शासन निर्णय क्र. प्राधिकरण-३२००४/प्र.क्र.३४२/का.७,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- १२ ऑगस्ट, २००४

पहा :- (१) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र : प्राधिकरण-२२००४/प्र.क्र.३३५/का.७, दिनांक १ जुलै, २००४.
(२) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र : प्राधिकरण-२२००४/प्र.क्र.३३६/का.७, दिनांक १ जुलै, २००४.
(३) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र : प्राधिकरण-२२००४/प्र.क्र.३३७/का.७, दिनांक १ जुलै, २००४.
(४) शासन निर्णय, उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, क्र : काआआ-१७०४/प्र.क्र.८६०/का.८. दिनांक १५ जुलै, २००४.

प्रस्तावना :-

महाराष्ट्रातील असंघटीत कामगारांचा (सोबत जोडलेल्या **परिशिष्ट ' अ '** मध्ये त्यापैकी काहींचा उल्लेख/समावेश आहे ) असा एक मोठा गट राज्यात कार्यरत असून त्यांना संघटीत कामगारांना मिळणाऱ्या लाभांसारखे लाभ मिळत नाहीत. तसेच या क्षेत्रातील बऱ्याचशा कामगारांचे वार्षिक उत्पन्न हे दारिद्रय रेषेच्या मर्यादेच्या खाली आहे. असंघटीत कामगारांसाठी विविध योजना तयार करुन त्यांची अंमलबजावणी व्हावी म्हणून राज्यस्तरावर विकास आयुक्तालय (असंघटीत कामगार) स्थापन करण्यात आले आहे. त्याचप्रमाणे संदर्भाधीन क्र. १ व २ येथील शासन निर्णयांद्वारे अनुक्रमे राज्य स्तरावरील प्राधिकरण व परिषद यांची स्थापना करण्यात आली आहे. तसेच जिल्हा स्तरावर कार्यकारी समित्या स्थापना करण्यात येणार आहेत.

२. भारतीय आयुर्विमा महामंडळातर्फे राबविण्यात येत असलेली जनश्री विमा योजना महाराष्ट्रातील सर्व असंघटीत कामगारांसाठी राबविण्याचा राज्य शासनाचा मानस आहे. जनश्री विमा योजना ही केंद्र शासन अनुदानित भारतीय आयुर्विमा महामंडळाची सामाजिक सुरक्षा योजना आहे. ही योजना १८ ते ६० वर्षे वयोगटातील, दारिद्रय रेषेखालील व्यक्तींसाठी असून, दारिद्रय रेषेच्या सीमारेषेच्या किंचित वर असणाऱ्या व्यक्तींनाही या योजनेखालील फायदे देय आहेत. प्रिमियमच्या वार्षिक रुपये २००/-

रोना प्रिंट/एच-592(500-8-04)1

Scanned by CamScanner

रकमेपैकी रुपये १००/- केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा निधीतून व उर्वरित रुपये १००/- संबंधित व्यक्तीकडून जमा केले जातात. जनश्री विमा योजनेनुसार सदस्यांना खालीलप्रमाणे लाभ मिळतात --

१) जनश्री सदस्याचा नैसर्गिक मृत्यू ओढवल्यास, त्याच्या वारसदारास रुपये २०,०००/-

२) अपघाती मृत्यू ओढवल्यास त्याच्या वारसदारास रु. ५०,०००/-

३) अपघातामुळे कायमस्वरुपी संपूर्ण अपंगत्व ओढवल्यास सदस्यास रुपये ५०,०००/-

४) अपघातामुळे सदस्याचे दोन्ही डोळे किंवा दोन्ही हात व पाय किंवा एक डोळा आणि एक हात व पाय गमावल्यास रु. ५०,०००/-

५) सदस्याने एक डोळा किंवा एक हात किंवा एक पाय अपघातामध्ये गमावल्यास रु. २५,०००/-

६) सदस्यांच्या मुलांच्या शिक्षणांकरिता "शिक्षा सहयोग" योजनेंतर्गत इयत्ता ९ वी ते १२ वी करिता तसेच आय.टी.आय. कोर्स करीत असल्यास व दरवर्षी उत्तीर्ण होत असल्यास दर तिमाही करिता रुपये ३००/- रक्कम प्रत्येकी (जास्तीत जास्त दोन मुलांकरिता) या प्रमाणे चार वर्षापर्यंत शिष्यवृत्ती, कोणतेही अंशदान न देता प्राप्त होते. शिष्यवृत्तीची संख्या मर्यादित असल्याने ही योजना गरीबातल्या गरीब विद्यार्थ्यांसाठीच लागू आहे. मात्र त्यासाठी सभासदांनी मध्यस्थी संस्थेमार्फत ( नोडल एजन्सी ) अर्ज करणे आवश्यक आहे.

**शासन निर्णय :-** या शासन निर्णयाद्वारे शासन असंघटीत कामगारांसाठी "जनश्री विमा योजना" लागू करीत आहे. परिणामतः राज्यातील असंघटीत कामगारांच्या नावांची नोंदणी करणे व त्यांना जनश्री विमा योजनेचा लाभधारक करणे या दोन महत्वाच्या बाबींची त्वरीत कार्यवाही होणे आवश्यक असल्याने त्यासाठीची कार्यपध्दती खालीलप्रमाणे ठरविण्यात येत आहे :-

१.१ जनश्री विमा योजनेचा वार्षिक हप्त्याच्या (प्रिमियम) रुपये २००/- रकमेपैकी रु. १००/- केंद्र शासनाच्या सामाजिक सुरक्षा निधीतून भरण्यात येईल व उर्वरित रु. १००/- पैकी निम्मी रक्कम, म्हणजेच रुपये ५०/- इतकी रक्कम राज्य शासन भरणार आहे व उर्वरित रुपये ५०/- रक्कम संबंधित व्यक्तीस भरावी लागणार आहे. या योजनेत सहभागी होण्यासाठी असंघटित कामगारांची नोंदणी करणे आवश्यक आहे व अशी नोंदणी करताना असंघटित कामगारांचे नांव, जन्मतारीख, पत्ता, उत्पन्नाचे साधन, वार्षिक उत्पन्न, नामनिर्देशन करावयाच्या व्यक्तीचे नाव, पत्ता व इत्थंभूत माहिती या बाबींचा समावेश आवश्यक आहे.



Scanned by CamScanner

१.२ असंघटित कामगारांना या योजनेची माहिती करुन देण्यासाठी सहाय्यकारी मध्यस्थी संस्थांची (नोडल एजन्सी ) आवश्यकता आहे. अशासकीय संस्था, कामगार संघटना, स्वयं मदत समूह (Self Help Group) इत्यादींची मध्यस्थ म्हणून मदत घेणे आवश्यक आहे. या अशासकीय संस्थांनी किमान २५ असंघटित कामगारांचा एक समूह या प्रमाणे समूहांची नोंदणी करावी. ज्या संस्थांची या कामासाठी निवड केली जाईल त्यांनी २५ जणांचे समूह करावेत. या अशासकीय संस्थांनी भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या कार्यालयात प्रिमियमची रक्कम जमा करावी. (त्यांच्या पी. ॲण्ड जी. एस. युनिटस्‌ची यादी सोबत **परिशिष्ट ' ब '** मध्ये जोडली आहे )

१.३ प्रशासकीय खर्चाच्या प्रतिपूर्तिचे ( reimbursement ) फायदे मिळण्यासाठी सहाय्यकारी संस्थांनी (नोडल एजन्सी ) एकूण २५० ते २५०० सदस्य गोळा करणे आवश्यक आहे.२५० ते २५०० सदस्य गोळा केल्यानंतर प्रती सभासद त्यांना रु.४/- ( रुपये चार फक्त ) इतकी प्रतिपूर्ति रक्कम नोडल एजन्सीला मिळेल. कामगार विभागाचे जिल्हास्तरीय कार्यालय व इतर शासकीय यंत्रणा यांनी विविध स्वयंसेवी संस्था ( Voluntary Oraganisation ), स्वयं मदत समूह ( Self Help Group ), कामगारांचे गट इत्यादी यांना एकत्रित व संघटित करुन अशाप्रकारे काम करावे की, जेणेकरुन प्रतिपूर्ती ( reimbursement ) चे काम सुलभरित्या पार पाडणे शक्य होईल व सदर सहाय्यकारी संस्थांना (नोडल एजन्सी ) प्रतिपूर्तीचे फायदे मिळविणे शक्य होईल.

२. **जिल्हास्तर :-** जिल्हा स्तरावर स्थापन करण्यात आलेल्या कार्यकारी समित्यांच्या मार्फत जिल्हयातील असंघटीत कामगारांना या योजनेचा लाभ प्राप्त करुन देण्यासाठी संबंधित जिल्हास्तरावरील, सरकारी कामगार अधिकारी / सहाय्यक कामगार आयुक्त यांनी दुकाने निरीक्षक व किमान वेतन निरिक्षकांमार्फत अशासकीय संस्था, कामगार संघटना, स्वयं मदत समूह (Self Help Group) यांचा शोध घेऊन असंघटीत कामगारांच्या नोंदणीची जबाबदारी त्यांचेवर सोपविण्याची कार्यवाही करुन असंघटीत कामगारांचा शोध घेण्यासाठी मदत करावी.

३. **ग्रामीण स्तर :-** किमान वेतन निरिक्षकांनी कार्यकारी समित्यांच्या सल्ल्याने ग्रामीण स्तरावर काम करणा-या कर्मचा-यांचे सहकार्य प्राप्त करुन घ्यावे. तसेच त्यांनी ग्रामसभांना देखील उपस्थित रहावे. या सभांमध्ये अशासकीय संस्था, कामगार संघटना व स्वयं मदत समूह यांना सुध्दा उपस्थित



Scanned by CamScanner

राहण्यास उद्युक्त करुन जास्तीत जास्त असंघटीत कामगार या योजनेत सहभागी होण्यासाठी सरकारी कामगार अधिकारी / सहाय्यक कामगार आयुक्त यांनी पुढाकार घ्यावा.

३.१ कार्यक्रम राबविण्यासाठी सुरुवातीला जिल्हा पातळीवर जास्तीत जास्त अशासकीय संस्थांना किंवा स्वयं मदत समूहांना (Self Help Group) प्रवृत्त करुन प्रत्येकी किमान २५ असंघटित कामगार जनश्री विमा योजनेचे सदस्य होतील, याची जिल्हास्तरावरील कार्यकारी समितीने दक्षता घ्यावी. तसेच असे जास्तीत जास्त समूह या योजनेचे सभासद होतील याचीही जिल्हास्तरावरील कार्यकारी समितीने दक्षता घ्यावी.

३.२ असंघटित कामगारांच्या नोंदणीचे कागदपत्र शासनाचा दस्तऐवज आहे. ही बाब लक्षात घेऊन दुकाने निरिक्षक / किमान वेतन निरिक्षक यांनी असंघटित कामगारांच्या नोंदणीची संपूर्ण माहिती तसेच जनश्री विमा योजनेच्या लाभधारकांची माहिती संकलित करुन कामगार आयुक्तांच्या परिसरातील नवनिर्मित विकास आयुक्त (असंघटित कामगार) यांना व कामगार विभाग, मंत्रालय, मुंबई यांना पाठवावी. जिल्हा कार्यकारी समितीला देखील ही माहिती द्यावी.

४. क्षेत्रिय अधिका-यांनी या योजनेची अंमलबजावणी करताना आवश्यकतेनुसार विकास आयुक्त (असंघटीत कामगार) यांचा वेळोवेळी सल्ला घ्यावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

बी.वि.प्रभु

( बी. वि. प्रभु )
शासनाच्या उप सचिव

प्रति,

१) मा. मुख्यमंत्री यांचे सह सचिव (श्री. ओक)
२) मा. उपमुख्यमंत्री यांचे कार्यालय
३) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
४) मा.मंत्री (सहकार) यांचे खाजगी सचिव
५) मा.मंत्री (सार्वजनिक बांधकाम) यांचे खाजगी सचिव
६) मा.मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव
७) मा.मंत्री (सार्वजनिक आरोग्य) यांचे खाजगी सचिव
८) मा.मंत्री (समाजकल्याण) यांचे खाजगी सचिव

एच



Scanned by CamScanner

९) मा.मंत्री (शालेय शिक्षण) यांचे खाजगी सचिव
१०) मा.मंत्री (महिला व बालविकास) यांचे खाजगी सचिव
११) मा. राज्य मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव.
१२) प्रधान सचिव (सामाजिक विकास समन्वय) यांचे स्वीय सहायक
१३) प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
१४) प्रधान सचिव(ग्रामविकास विभाग) यांचे स्वीय सहायक
१५) उप सचिव (श्रीम.प्रभु) यांचे स्वीय सहाय्यक
१६) कामगार आयुक्त, मुंबई
१७) विकास आयुक्त (असंघटित कामगार), मुंबई. कामगार आयुक्त कार्यालय, ताडदेव, मुं. ३४
१८) सर्व विभागीय आयुक्त, मुंबई/पुणे/नाशिक/औरंगाबाद/अमरावती/नागपूर.
१९) सर्व जिल्हाधिकारी.
२०) सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
२१) सह कामगार आयुक्त,मुंबई
२२) अपर कामगार आयुक्त, मुंबई, पुणे , नागपूर
२३) सर्व उप कामगार आयुक्त
२४) मंत्रालयाच्या निरनिराळया विभागांच्या अधिन असलेल्या सर्व विभागांचे व कार्यालयाचे प्रमुख
२५) कामगार विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभागीय व क्षेत्रिय कार्यालये.
२६) मंत्रालयीन सर्व विभाग.
२७) सर्व महानगरपालिका व नगरपरिषदा, महाराष्ट्र राज्य.
२८) कामगार विभागातील सर्व अधिकारी, मंत्रालय, मुंबई ३२.
२९) भारतीय आयुर्विमा महामंडळ, मुंबई (सर्व कार्यालयाचे प्रमुख )
३०) प्राधिकरण/निवड नस्ती- (का-७)

Scanned by CamScanner

## परिशिष्ट 'अं'

१) विडी कामगार

२) ऊस तोड कामगार

३) बांधकाम मजूर

४) दगड खाणीतील कामगार

५) विणकर

६) यंत्रमाग कामगार, शेतकरी, मच्छिमार,

७) शेतमजूर

८) कचरा गोळा करणारे

९) घरकामगार

१०) रिक्षा ओढणारे कामगार

११) वर्तमानपत्र वाटप करणारे कामगार इत्यादी

Scanned by CamScanner

## परिशिष्ट 'ब'

### राज्यातील भारतीय आयुर्विमा महामंडळाच्या पी अॅन्ड जी. एस. युनिटस्‌ची यादी

| पी अॅन्ड जी. एस. युनिटं | युनिट प्रमुख व युनिटचा पत्ता | दूरध्वनी (कोडसह) | अधिपत्याखालील जिल्हे |
|---|---|---|---|
| १) अमरावती | शाखा व्यवस्थापक (पी अॅन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी अॅन्ड जी. एस. युनिट, जीवन प्रकाश, डाफरीन हॉस्पीटल जवळ, श्रीकृष्ण पेठ, अमरावती - ४४४ ६०१ | ९५७२१-२६६२९६७ | १. अमरावती<br>२. अकोला<br>३. वाशीम<br>४. यवतमाळ<br>५. बुलढाणा |
| २) औरंगाबाद | शाखा व्यवस्थापक, (पी अॅन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी अॅन्ड जी. एस. युनिट, जीवन प्रकाश, अदालत रोड, औरंगाबाद - ४३१ ००५ | ९५२४०-२३४८५३४/२३३३४७५ | १. औरंगाबाद<br>२. बीड<br>३. हिंगोली<br>४. जालना<br>५. लातूर<br>६. नांदेड<br>७. उस्मानाबाद<br>८. परभणी |
| ३) मुंबई | विभागीय व्यवस्थापक, (पी अॅन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी अॅन्ड जी. एस. युनिट-१, योगक्षेम, ४ था मजला, ईस्ट विंग, जीवन बीमा मार्ग, मुंबई- ४०० ०२१ | ९५२२-२२०४५५८५ | १. मुंबई जिल्हा<br>२. मुंबई उपनगर जिल्हा |
| ४) नागपूर | व्यवस्थापक, (पी अॅन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी अॅन्ड जी. एस. युनिट, नॅशनल इन्शुरन्स बिल्डींग, सरदार वल्लभभाई पटेल मार्ग, पोस्ट बॉक्स क्र. ६३, नागपूर ४४० ००१ | ९५७१२-२५६४३८२ | १. नागपूर<br>२. चंद्रपूर<br>३. गडचिरोली<br>४. गोंदिया<br>५. भंडारा<br>६. वर्धा |
| ५) नाशिक | शाखा व्यवस्थापक (पी अॅन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी अॅन्ड जी. एस. युनिट, जीवन प्रकाश, आर.जी. गडकरी चौक, गोल्फ क्लब ग्राऊन्ड, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२ ००२ | ९५२५३-२५७३५२० | १. नाशिक<br>२. जळगांव<br>३. नंदुरबार<br>४. धुळे |



Scanned by CamScanner

| | | | |
|---|---|---|---|
| ६) पुणे | व्यवस्थापक, (पी ॲन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी ॲन्ड जी. एस. युनिट, जीवन प्रकाश, ६/७, शिवाजी नगर, युनिव्हर्सिटी रोड, पुणे ४११ ००५ | ९५२०-२५५३६४७२/ २५५३६१५३ | १. पुणे<br>२. अहमदनगर<br>३. सोलापूर |
| ७) सातारा | शाखा व्यवस्थापक, (पी ॲन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी ॲन्ड जी. एस. युनिट, जीवन तारा, गणपतदास देवी पथ, सातारा ४१५ ००१ | ९५२१६२-२२८२०५ | १. सातारा<br>२. सांगली<br>३. कोल्हापूर<br>४. रत्नागिरी<br>५. सिंधुदुर्ग |
| ८) ठाणे | शाखा व्यवस्थापक, (पी ॲन्ड जी. एस.) भारतीय आयुर्विमा महामंडळ, पी ॲन्ड जी. एस. युनिट, जीवन चिंतामणी, वसंतराव नाईक महामार्ग, पोस्ट बॉक्स नं ४६४. ठाणे ४०० ६०४ | ९५२२-२५८३३२२२ | १. ठाणे<br>२. नवी मुंबई<br>३. रायगड |

एच–592(500–8–04)4अ.

Scanned by CamScanner